माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781 www.rtimahasangh.weebly.com

वर्ष १० वे. अंक ८ वा रायगड-पनवेल दिनांक १ ते ३१ ऑगष्ट २०२१ पाने १० किंमत २० रूपये

## माहिती असालाच हवेत, बँक ग्राहकांचे अधिकांर!







## इंग्रजी शाळांत पालकांची अशी होते लूट..

## बेस्ट ॲक्टीविस्ट ऑफ द मंथ, ऑगष्ट २०२१





## जावेद दुलेखाँन आत्तार सातारा

मासिक **नागरिक अधिकार**

सुभाष बसवेकर
● संपादक ●

शेखर कोलते
●कार्यकारी संपादक●

जिल्हा - प्रतिनिधी

जयवंत टेंबूलकर (मुंबई)
प्रभाकर गंगावणे (रायगड)
समीर शिरवाडकर (रत्नागिरी)
अब्राहम आढाव (पुणे)
संतोष कदम (सातारा)
बंडोपंत चौगुले (सांगली)
अर्जन रामा असणे (जळगांव)
सोपान पवार (औरंगाबाद)
बळवंत जाधव (लातूर)
जयसिंग सिल्लोडे (जालना)
विलास प्रताप शिंदे (नांदेड)
गोपाळ तौर (बीड)
रोहिदास सावळे (धुळे)
रविकुमार गोरे (हिंगोली)
नामदेव चापके (परभणी)
उज्ज्वल राजपूत (नाशिक)
राजू शिंदे (नंदूरबार)
संतोष जाधव (यवतमाळ)



पत्ता : **नागरिक अधिकार**
शॉप नं.०३ प्लॉट नं.०६
हर्मोनी बिल्डींग सेक्टर ०१ खांदा कॉलनी
नवीन पनवेल ४१०२०६
मो.९२२३५१६९२०
e- mail : rtimahasangh@gmail.com



अंक दर महिन्याच्या एक तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.


## संपादकीय..........

# माहिती अधिकार
# सरकारला जाब विचारण्यांचा अधिकार...

घराचा कारभारी जर सगळ्या कुटुंबांची काळजी घेणारा व कुटुंबांचे हित सांभाळणारा असेल तर कुटुंबाची भरभराट होते.पण घराचा कारभारी जर उधळ्या,व्यसनी व भ्रष्ट असेल तर ते घर बरबाद होतं.

जे घराचं तेच सरकारचं.

सरकारं जर लोकांच्या हितांची काळजी करणारी असतील तर देशाची भरभराट होते. पण हीच सरकारं जर भ्रष्ट, उधळपट्टी करणारी असतील तर देश बरबाद होण्यास वेळ लागत नाही.

कुटुंबातील कारभाऱ्याला जर कुटुंबांतील अन्य सदस्य जाब विचारणार असतील हिशोब विचारणार असतील तर कारभारी नीट कारभार करतो.

तसेच सरकारला जर जनता जाब विचारणार असेल तसेच हिशोब विचारणार असेल तर सरकार नीट काम करते.जर जनता सजग नसेल सरकार भ्रष्ट होण्यास वेळ लागत नाही.

आपल्या देशात सरकारला जाब विचारणारा, सरकारला हिशोब विचारण्याचा व सरकारला नीट वागण्यास भाग पाडण्याचा कायदा आहे. त्या कायद्याचं नाव आहे माहितीचा अधिकार अधिनियम २००५

निवडूण गेलेले लोकप्रतिनिधी व सरकारी नोकरशाही मिळून सरकार बनत.

सरकारचं काम असतं कायदा व सुव्यवस्था राखणं. धोरण आखण व विकास करणं. हे काम सोडून सरकारं सत्तेचा दुरउपयोग करीत जर प्रचंड पैसे खात असेल. काम करीत नसेल व भ्रष्टाचार करीत असेल तर अशा सरकारला जाब व हिशोब विचारणे हे प्रत्येक सजग नागरिकांचे कर्त्यव्य बनते. माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा प्रत्येक भारतीयांनी शिकून व समजून घेतला पाहिजे.

कारण हा कायदा सरकारला जाब विचारण्याचा व हिशोब विचारण्याचा भारतीय नागरिकांना अधिकार प्रदान करतो.

सरकारकडे टॅक्सच्या रूपात जमा होणारे पैसे हे प्रत्येक भारतीय नागरिकांनी दिलेले पैसे असतात.

माहितीच्या अधिकार वापरून प्रत्येक भारतीय नागरिक सरकारच्या प्रत्येक योजनेवर सरकारने

१.किती खर्च केला ?२.केव्हा खर्च केला ?३.कसा खर्च केला ४.कोणासाठी खर्च केला ? प्रत्येक रूपयांचा हिशोब विचारू शकतात.

माहितीचा अधिकार हा हिशोब विचारण्याचा अधिकार आहे ?

माहितीचा अधिकार हा जाब विचारण्याचा अधिकार आहे

# जाणून घ्या बँक ग्राहकांचे माहित नसलेले अधिकार!

बँकांशी निगडित विविध कामामध्ये बहुतेक लोकांना अडचणी येतात. ग्राहकांना बरेचदा आपल्या अधिकारांची संपूर्ण माहिती नसते.

बँक ग्राहकांचे काय व कोणते अधिकार असतात. हे आपण आता जाणून घेऊ.

त्यामुळे या अडचणींपासून सुटका होण्यासाठी बँकिंग कोड्स अँड स्टॅन्डर्ड्स बोर्ड ऑफ इंडिया (बीसीएसबीआई) ही सर्व बँकानी एकत्र येऊन ग्राहकांना गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी बनविलेले

संस्था आहे. या संस्थेने बँक ग्राहकांच्या प्रति बांधीलकीचा संहिता **(Code of Bank's Commitment to Customers)** तयार केलेली आहे. ही संहिता प्रत्यक्षात आचरणांत आणणे हे बीसीएसबीआई च्या सर्व सभासद बँकाच कर्तव्य आहे. ही संहिता प्रत्येक ग्राहकांनी वाचून काढली पाहिजे.या संहितेच्या मराठी प्रतीची लिंक खाली डिस्क्रीप्शन मध्ये दिली आहे. ती तुम्ही डॉउनलोड करून घेऊ शकता.

या संहिते बरोबरच बँक ग्राहक म्हणून तुम्हाला माहिती पुढील १० बाबी माहिती असायलाच हव्यात.

आता आपण हे १० मुद्दे पाहू

नंबर १.बँकेत खाते उघडताना पत्यावरून बऱ्याचदा गाडी असते. मात्र लक्षात घ्या, कोणतीही बँक फक्त स्थायी **(fix)** पत्ता नसल्याने देशामध्ये कोठेही राहणाऱ्या भारतीय नागरिकाचे खाते उघडण्यासाठी कधीही नकार देऊ शकत नाही.

नंबर २. कोणताही व्यक्ती कोणत्याही बँकेमधून ँइंऊ च्या माध्यमातून ५५०,००० रुपयापर्यंतची रक्कम कोणत्याही इतर बँकेच्या खात्यामध्ये जमा करू शकतो. विशेष म्हणजे त्यासाठी संबंधित बँकेमध्ये त्या व्यक्तीचे खाते असणे गरजेचे नाही.

नंबर ३.चेक कलेक्शनमध्ये बँकेकडून दिलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ लागल्यावर ग्राहकांना भरपाई मिळण्याचा अधिकार आहे. भरपाईची रक्कम साधारण व्याज दराच्या हिशोबाने चुकवली जाईल.

नंबर ४.जर एखाद्या ग्राहकाने बँकमधून लोन घेतले आहे आणि त्यासाठी सिक्युरिटी दिली असेल, तर या प्रकरणामध्ये पूर्ण लोन फेडल्यानंतर १५ दिवसांच्या आतमध्ये सिक्युरिटी परत मिळाली पाहिजे.

नंबर ५.बँक आणि तुमच्यामध्ये झालेल्या करारामध्ये जर बँकेने कोणताही बदलकेला, तर बँकेला असे करण्याच्या 30 दिवस आधी नोटीस पाठवून तुम्हाला त्याची माहिती देणे गरजेचे आहे.

नंबर ६.ग्राहकाच्या बँक खात्यामधून अनधिकृत काढलेल्या पैशांसाठी







ग्राहकाला दोषी ठरवता येत नाही. त्याला सिद्ध करण्याची जबाबदारी बँकेची असते. अधिकार आहे.

नंबर ७.कोणतीही बँक कोणत्याही ग्राहकाला जबरदस्ती थर्ड पार्टी इंँव्ळणऊए विकू शकत नाही. थर्ड पार्टी प्रोडक्ट म्हणजे असे उत्पादन जे संबंधित बँकेचे नसते. दुसऱ्या कुठल्यातरी कंपनीने किंवा बँकेच्या उपकंपनीने ते उत्पादन बँकेला विकण्यासाठी दिलेले असते आणि बँकेला ते विकण्याचा मोबदला दिला जातो.

नंबर ८.ग्राहकांची खाजगी माहिती गुप्त ठेवणे बँकेची प्रमुख जबाबदारी आहे. बँक तुमची खाजगी माहिती तुमच्या संमतीशिवाय कोणालाही सांगू शकत नाही.

नंबर ९.कर्ज नाकारण्याचा अधिकार जरी बँकेला असला, तरी कर्ज का नाकारले, याचे लेखी उत्तर ग्राहकाला देणे अनिवार्य आहे.

नंबर १०.जर तुमच्या जवळ जुनी किंवा फाटलेली नोट असेल, तर ती तुम्ही कोणत्याही बँकेतून बदलून घेऊ शकता. नोटा बदलून देण्यासाठी बँक तुम्हाला नकार देऊ शकत नाही.

या शिवाय आणखी खालील माहिती तुम्हाला बँक ग्राहक म्हणून

# जाणून घ्या बँक ग्राहकांचे माहित नसलेले अधिकार!

नक्कची माहिती पाहिजे.

बऱ्याचदा तुम्ही एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी जाता आणि हे एटीएम ट्रान्झक्शन फेलजातं. परंतु, थोड्याच वेळात तुमच्या मोबाईलवर पैसे कापले गेल्याचा मॅसेज येतो. बऱ्याचदा अशावेळी पैसे बँकेकडून रिफंड केले जातात. तर अनेकदा कस्टमर केअरला फोन किंवा मेलकरून तक्रार दाखलकरावी लागते.

परंतु, आरबीआयच्या नियमांनुसार, ज्या दिवशी तुम्ही फेलट्रान्झक्शनची तक्रार दाखलकरता त्यानंतर सात दिवसांत (वर्किंग डे) तुम्हाला जर रिफंड मिळाला नाही तर बँक प्रती दिवसासाठी १०० रुपयांच्या हिशोबानं तुम्हाला दंड भरेल.

जर तुमच्यासोबत असं कधी घडलं आणि पैसे हातात न मिळताही तुमच्या अकाऊंटमधून पैसे कापले गेले तर त्याची सर्वप्रथम तक्रार दाखलकरा. ज्या बँकेनं तुम्हाला हे कार्ड दिलंय त्या बँकेच्या कस्टमर केअरशी संपर्क करा.

तुम्ही कोणत्या एटीएममधून ट्रान्झक्शन केलंय त्याचा कोणताही फरक पडत नाही.

फेलट्रान्झक्शन होऊनही अकाऊंटमधून पैसे कापले गेले तर बँकेला सात दिवसांच्या आत तुम्हाला रिफंड द्यावा लागेल.

तुम्ही तक्रार दाखलकेली नसेलतरीदेखीलबँक तुम्हाला रिफंड करण्यासाठी बांधिलअसेल.


तुम्हाला तक्रार दाखलकरायची असेलतर ३० दिवसांच्या आत तुम्हाला हे काम करावं लागेल. अनेकदा २४ तासांच्या आत ग्राहकांना रिफंड केला जातो.

वरीलपैकी, कोणत्याही बाबतीत तुम्हाला बँकेचा ग्राहक म्हणून अधिकार नाकारला असेल, किंवा कोणतंही सबळ कारण नसताना कर्ज नाकारलं असं वाटत असेल, किंवा बँक तुमच्याकडून जास्तीची वसुली करतेय असा प्रकार असेल, तर तुम्ही बँकिंग लोकपालयांच्याकडे लेखी स्वरूपात तक्रार करू शकतात.बँकींग लोकपाल चा पत्ता बँकेत दर्शनी भागात लिहिलेला असतो.तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया च्या वेबसाईटवर याची संपर्ण माहिती मिळू शकते.

तक्रार पहिल्यांदा बँकेच्या शाखा अधिकारी यांचेकडे करावी जर तेथे समाधान झाले नाही तर बँकेच्या विभागीय कार्यालयाकडे करावी.

जर तिथे समाधान झाले नाही तर मग बँकींग लोकपाल कडे तक्रार करावी

## अंमलबजावणी व देखरेख




रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने बँक ग्राहकांच्या हक्काची सनद बनविलेली आहे. त्यात बँक ग्राहकांचे पाच मुलभूत अधिकार सांगितलेले आहेत.ते पुढील प्रमाणे.

नंबर -१ सभ्य व योग्य वागणूक मिळण्यांचा अधिकार :

**( Right to Fair Treatment)**

नंबर-२ पादर्शक,योग्य व कसलीही फसवणूक न होतो सेवा मिळणेचा अधिकार

(Right to Transparency; Fair and Honest Dealing;)

नंबर-३ ग्राहकाला योग्य व अनुरूप सेवा मिळण्यांचा अधिकार

**(Right to Suitability)**

नंबर -४ खाजगीपण व गुप्तता जपली जाण्याचा अधिकार

(Right to Privacy)

नंबर -५ तक्रार करण्यांची सोय असण्यांचा व तक्रार निवारणांचा व भरपाईचा अधिकार

( Right to Grievance Redress and Compensation.)

# इंग्रजी शाळांत पालकांची अशी होते लूट...?

इंग्लिश माध्यमांच्या शाळा मधूनच आपलं मूल शिकलं पाहिजे. हा एक गोड गैरसमज पालकांच्या मनात रूजलेला आहे.काहीही झालं तरी कितीही खर्च होत असला तरी आणि मुख्य म्हणजे परवडत नसलं तरी माझं मूलं मी इंग्लिश मेडियममध्येच शिकवणार अशी मनासिकता गरीबांपासून ते श्रीमंतापर्यंत सगळ्यांच पालकांची झालेली आहे.

दुसऱ्या बाजूला आजचं युग हे माहिती व तंत्रज्ञानाचं डिजीटल युग आहे.आणि इंग्रजी ही ग्लोबल भाषा आहे.त्यामुळे इंग्रजी शिवाय पर्याय नाही. हे काही अंशी खरं सुद्धा आहे. म्हणून मुलांचं शिक्षण इंग्रजी माध्यमातूनच व्हावं हा पालकांच्यासाठी एक संवेदनशील व भावनिक मुद्दा असतो.

ही पालकांची मानसिकता ओळखून इंग्रजी माध्यमातून शाळा काढा व पालकांच शोषण करा व प्रचंड आर्थिक संपत्ती कमवा.असा धंदाच बहूसंख्य इंग्लिश माध्यमांच्या संस्थां चालकांनी सुरू केला आहे. शिक्षणांचा बाजार करणारे हे शिक्षण सम्राट नाहीत ते ते शिक्षण माफिया आहेत.

अर्थात याला काही संस्था म्हणून अपवाद असू शकतील,पण अपवादाने तर नियम सिद्ध होतो. पण मी पाहिलेले बहूतेक संस्थाचालक हे लूटारू संस्थाचालक आहे. पण ज्या खंरच उत्तम रितीने व विद्यार्थी केंद्रबिंदू मानून चालणाऱ्या व वाजवी शुल्क घेऊन व ध्येयप्रेरीत होऊन चालविल्या जाणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा आहेत.त्यांना उद्देशून हा व्हिडीओ नाही.

खरं तर शिक्षणांची प्रक्रिया हे सेवेच्या स्तरावर घडली पाहिजे.किमान प्राथमिक शिक्षण सर्व बालकांना सक्तीचे मोफत व दर्जेदार मिळालं पहिजे. फार तर शिक्षण संस्था या ना नफा ना तोटा या पद्धतीने चालविल्या पाहिजेत.तसंचं शिक्षण संस्था चालवणं हे नफा मिळविण्याचं क्षेत्र नाही. हे आपल्या संविधानाला व कायद्याला अपेक्षित आहे.पण सगळे नियम धाब्यावर बसवून सगळे कायदे झुगारून, मंत्री,संत्री व शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यांना प्रचंड पैसे खाऊ घालून इंग्रजी संस्थाचालकांनी शिक्षण क्षेत्रात हैदोस घातलेला आहे.वरून रंगीबेरंगी व मोहक दिसणारं इंग्रजी माध्यामातील शिक्षण आतून मात्र काळ्या पैशांनी अक्षरक्ष: काळ करून टाकलेलं आहे.

मंत्रालयात पैसे देऊन शाळेच्या परवानग्या मिळवा.परिक्षा बोर्डात पैसे देऊन मान्यता मिळवा.बेकायदेशीर व गैरमार्गाने पैसा गोळा करा. त्या पैशातून मोठी व भव्य इमारत बांधा,सगळा खोटा व बेगडी माहौल तयार करा.शिक्षणांच्या नावाखाली पालकांना लूटत रहा.ही इंग्रजी माध्यमांच्या शाळा चालकांची कार्यपद्धती अर्थात मोडस ऑपरेंडी आहे.




ज्याची छापाई किंमत दहा रूपये असते असे शाळेचे माहिती पत्रक किंवा ब्रोशर पाचशे ते हजार रूपयांना विकले जाते.

अभ्यासक्रमांची पुस्तके,गणेवश,बेल्ट,इतर शैक्षणिक साहित्य बाजारभावापैक्षा कितीतरी अधिक किंमतीने शाळेकडूनच घेण्याची सक्ती केली जाते. प्रवेश फी,रजिस्ट्रेशन फी,लायब्ररी फी, लॅब फी,टयुशन फी,टर्म फी, सहल, प्रोजेक्ट, गणवेश, बूट, पुस्तके वहया,यांचे भरमसाठी शुल्क अदर फीस अबब सतत पालकांच्या खिशावर दरोडा टाकला जातो.शाळेची स्कूलबस सुविधा घेण्याचे बंधनही पालकावर व विद्यार्थ्यावर लादले जाते.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत बहुतेक करून महिला शिक्षिका नियुक्त केल्या जातात.इंग्रजी शाळेत शिक्षिकांना जे पगार दिले जातात. ते अतिशय कमी असतात. काही ठिकाणी तर

# इंग्रजी शाळांत पालकांची अशी होते लूट...?

शिक्षकांची शैक्षणिक पात्रताही नसते.

आज मोठ्या शहरात एक मुलांचा एका वर्षाचा शाळेची फस व अन्य खर्च प्रती मूलं एक लाख रूपये आहे. मध्यम शहरात पंन्नास हजार व छोट्या गावांत पंचवीस हजार रूपये आहे.

ज्या शाळेत केजी ते दहावी पर्यंत साधारणत पाचशे ते हजार विद्यार्थी असतील तर अशा शाळेचे वार्षिक टनओव्हर हे तीन कोटी ते पाच कोटी रूपये किंवा त्यापेक्षा जास्त असते.

हे संस्थाचालक भरमसाठी फीस गोळा करतात. शाळेत नियुक्त केलेल्या शिक्षकांना अतिशय कमी पगारावर राबवून घेतात.आणि अगोदरच्या शाळेच्या माध्यमातून अतिरिक्त व प्रचंड पैसा साठवून पुन्हा इतर नवीन शहरात मोठी इमारत बांधून पुन्हा नवीन शाळा सुरू करतात.आणि तेथे पुन्हा पालकांची लूट सुरू करतात.

कित्येक नावाजलेल्या शिक्षण संस्थांच्या देशभरातील मोठमोठ्या शंभर-शंभर किंवा त्याहून अधिक शाळा आहेत.हे संस्थाचालक शाळांच्या माध्यमातून दरवर्षी अब्जावधी रूपयांचा अतिरिक्त पैसा उभा करतात.त्या पैशातून प्रचंड भव्य व दिव्य इमारती बांधतात.त्यात पुन्हा नव्या शाळा सुरू करतात.या शाळांचे व शाळा चालविणाऱ्या ट्रस्टचे बँक खाते व आर्थिक हिशोब तपासले तर यामध्ये प्रचंड मोठया प्रमाणात कायदा तोडून किंवा कायदा वाकवून लाखो कराडोंचा अतिरिक्त पैसा जमा केलेला असल्याचे दिसून येइल.शिक्षणांचा पवित्र नावाखाली पालकांना लूटून असा अतिरिक्त निधी उभा करणे हे बेकायदेशीर कृत्य आहे.

देशभरातील सर्व इंग्रजी माध्यमांच्या साखळी शाळामधून दरवर्षी पालकांची साधारणत: पन्नास हजार कोटी रूपयाची लूट होत आहे.शिक्षण क्षेत्रात पालकांना लूटून तयार होणार हा अतिरिक्त पैसा घातक आहे. यासंदर्भात शासन स्तरावर मनुष्यबळ विकास मंत्रालयाने एक चौकशी आयोग नेमून रिपोर्ट किंवा श्वेतपत्रिका जाहिर केली पाहिजे.

पालकांनी हे लक्षात घ्यावं की ज्या शाळा पालकांना लूटतात. ज्या शाळांचा अंतिम हेतू पैसा कमाविणे हा असतो.त्या शाळा तुमच्या मूलांना उत्तम शिक्षण देऊन प्रमाणीक,जबाबदार व जीवन जगण्यासाठी सक्षम माणूस म्हणून घडवू शकणार नाहीत.

या शाळांचे संस्थाचालक, राज्य सरकारच्या शिक्षण अधिकाऱ्यांना भित नाहीत. या शाळा राईट टू इज्यूकेशन कायद्याचे नीट पालन करीत नाही.या शाळा स्टेट,सीबीएसई व आयसीएसई या बोर्डाने आखून दिलेले नियम पाळत नाहीत.शिक्षक -पालक सभा गुंडाळून ठेवतात. जी माहिती वेबसाईटवर प्रकाशीत करणे बंधनकारक आहे ती माहिती टाकत नाहीत.

या लूटारू शाळांना लगाम लावण्यासाठी कायदे व नियम तर केले आहेत.पण कायद्याची व नियमांची कोटेकोर अंमलबजावणी करण्यांची इच्छाशक्ती शासन व विरोधी पक्षांकडे नाही. कारण अशा शाळा बहूतेक करून सर्वपक्षीय राजकारणी लोकांच्या आहेत. किंवा जे प्रचंड मोठे ट्रस्ट आहेत.ज्यांच्या दहा,पन्नास किंवा शंभर शंभर साखळी शाळा आहेत. ते लोक राजकारणी व सत्ताधारी मंडळीना निवडणूक काळात खूप मोठ्या देणग्या देतात. पालकांकडून बेहीसाब पैसा लूटायचा व सर्व यंत्रणा विकत घ्यायच्या हे तंत्र त्यांना चांगलेच आवगत झालेलं आहे. त्यामुळे या इंग्रजी शाळा संचालकांना ना कायद्याचे भय ना सरकारचे भय आहे. त्यामुळे हे संस्थाचालक मूजोर बनले आहेत.

हे सर्व पालकांना माहित आहे. पण आपल्या मुलांना शाळा टार्गेट करीन, शाळेतून काढून टाकीन, आपल्या मुलांचे नुकसान होईल या भीतीपोटी पालक हतबल व लाचार बनले आहेत.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांची ही वस्तूस्थिती आहे. पण हे बदलायला हवं त्यासाठी

पालकांनी संघटीत होऊन निष्क्रीय सरकारवर दबाव आणाला पाहिजे.

शिक्षक पालक सभा अधिक सक्रिय व सक्षम बनविल्या पाहिजेत.

साखळी शिक्षण संस्थाचा पालक लूटीचा हा धंदा रोखला पाहिजे.

शाळांचा व्यवहार अधिक पारदर्शी व विद्यार्थी केंद्रीत व्हावा म्हणून कायद्यात योग्य त्या सुधारणा झाल्या पाहिजेत.

शाळांचे सर्व आर्थिक व्यवहार पारदर्शी झाले पहिजेत.म्हणून परिक्षा बोर्डांनी त्यांचे नियम कठोरपणे राबविले पहिजेत.

या पालकांच्या होत असलेल्या लूट व आर्थिक शोषणाविरोधात पालकांनी व सजग नागरिकांनी कसा लोकलढा उभा केला पाहिजे.

# एका अर्जाची कमाल

## माहिती अधिकार अर्ज करताच होम लोन सब्सिडी खात्यावर जमा

पुणे :- माहितीचा अधिकार अधिनियम (RTI) २००५ नुसार माहितीचा अधिकार अर्ज़ात लहान मोठे घोटाळे उघड़किस आल्याचे प्रकरण आपन एकत व वाचत ही असतो. यासोबतच माहितीचा अधिकार अर्ज करताच दोन वर्षापासुन बैंकेत अडकलेली होम लोन सब्सिडीची रक्कम एका लाभार्थीच्या खात्यावर अवघ्या पाच दिवसात जमा झाल्याची घटना पुणे शहरात घडली आहे.

सविस्तर वृत्त अशे की , पुणे जिल्ह्याच्या वडगावशेरी येथील रहिवाशी अब्राहाम आढाव यांनी २०१९ साली पुणे येथे फ्लॅट विकत घेतला होता . त्यासाठी त्यांनी आईसीआईसीआई बँकेकडून ११,१८००० रूपयांचे होम लोन ही घेतले होते .पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत २६,७२८० रूपयांचे लोन सब्सिडीसाठी रीतसर अर्ज सुद्धा भरून दिला होता. आढाव यांचे हे पहिलेच घर होते म्हणून नियमानुसार त्यानां त्या सब्सिडीचा लाभ मिळणारच अशी त्यांना पक्की खात्री होती.

त्या सब्सिडीच्या अर्ज़ामध्ये अर्जदार म्हणून आढाव आणि त्यांच्या पत्नीचें नाव होते. चार ते पाच महिन्यात सब्सिडी खात्यावर येईल, अशी त्या दोघांना अपेक्षा होती.

परंतु दीड वर्ष ओलांडले तरी सब्सिडी खात्यावर जमा झालीच नाही. आढाव यांनी त्या बँकेशी संपर्क केला असता त्यांनी अर्ज सरकारी कार्यालयाकडे योग्य रित्या पाठवले असल्याचे सांगून त्यांचा अर्ज क्रमांक सुद्धा आढाव यांना दिला. आढाव यांनी आपल्या अर्ज़ावर पाठपुरावा करण्याचे ठरविले . आढाव हे स्वताच एक माहितीचा अधिकार कार्यकर्ता असून माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघचे पदाधिकारी सुद्धा आहेत. त्यांनी महासंघच्या वरिष्ठ व अनुभवी अधिकाऱ्यांचें मार्गदर्शन घेवून मिनिस्ट्री ऑफ हौसिंग विभागाकडे ऑनलाइन माहितीचा अधिकार अर्ज केला. त्या विभागाने त्यांचा अर्ज सब्सिडी विषयी कार्यवाही करणाऱ्या तीन प्राधिकरणाकडे वर्ग करून माहिती देण्याचे आदेश दिले. परंतु त्या प्राधिकरनाकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे आढाव यांनी कलम १९(१) प्रमाणे प्रथम अपील दाखल केले, सोबतच बँकेशी अनेकदा पाठपुरावा करूनही त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नाही, तरीही आढाव यांनी हताश न होता माहिती अधिकारांच्या च्या माध्यमातून पाठपुरावा करण्याचे ठरविले.

# रोजगार मागणाऱ्या युवकांवर पोलीसांचा दबाव,भूमिपूत्रांची न्यायासाठी हाक !

प्रतिनिधीः यवतमाळ जिल्हा झरी जामनी – तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांनी एकत्र येत मुकुटबन परिसरातील कोळसा खदान आणि सिमेंट उद्योगामध्ये स्थानिक भूमि पुत्र, प्रकल्पग्रस्त सुशिक्षित बेरोजगार युवकांना प्रशिक्षण केंद्र उभारून त्यांना रोजगार उपलब्ध द्या. अशा मागणीचे निवेदन ७० ते ८० बेरोजगार युवकांनी कंपनी कडे केली. मात्र दोन दिवसानंतर एका कंपनी प्रशासनातील अधिकार्याच्या सांगण्यावरून मुकुटबन ठाणेदार धर्मा सोनुने यांनी निवेदनकर्त्याच्या नातेवाईकाला पोलीस स्टेशन मध्ये बोलवून . तुझ्या पुतण्यावर खंडणीचे गृहणे दाखल करून जबर युवकांना मारहाण करण्याची धमकी दिली. या घटनेमुळे सर्व निवेदनकर्त्या सुशिक्षित युवकांच्या मनात पोलीस प्रशासनातील अधिकार्याविषयी दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रक्षण करणारेच जर भक्षण करतील तर आह्मी जगावे कसे असा प्रश्न नागरिकांच्या मनात पडला आहे. घराबाहेर पडताना सुद्धा अनेकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे.

झरी तालुक्यात आता पर्यंत ५ मोठ्या खाणी तसेच सीमेंट उधोग आहे. अनेक मोठं भांडवलदार झरी तालुक्यात येत आहे. मोठं मोठे उधोग उभारून करोडोची कमाई करीत आहे.तरी सुद्धा येथील सुशिक्षित बेरोजगार तरुण हा उधोगमध्ये काम करण्यासाठी लागणारे शिक्षण घेऊनही बेरोजगार आहे. त्यामुळे स्थानिक युवकांनी एकत्र येत कंपनी प्रशासनाला रोजगाराची निवेदनातून मागणी केली. पण स्थानिक पोलीस ठाणेदार यांचे कंपनीतील काही अधिकाऱ्यां सोबत अतिशय घनिष्ट असे संबंध असल्यामुळे कंपनी समोर रोजगार मागण्यासाठी १० ते १५ जरी युवक जमा झाले तरी सुद्धा पोलीस प्रशासनातील कर्मचारी हे तात्काळ हजर होतात. काही पोलीस कर्मचारी पेट्रोलिंग कमी तर कँपनी मध्ये कॅबिन, व गाडीत जास्त दिसत असल्याचे चित्र परिसरात दिसत आहे.

मुकुटबनमध्ये गोतस्करी, खुले आम दारू विक्री राजरोज पणे सुरू असते आहे.पण या सर्वांवर ठाणेदाराचा आशीर्वाद आहे. यामुळे अवैध धंदेवाल्याना पाठबळ मिळत आहे. मुकुटबन परिसरातील अवैध दारू ,गोतस्करीची माहिती देऊन सुद्धा कारवाही होत नाही.काही युवकांच्या मोबाईल मध्ये सुद्धा गोतस्करी ,व खुले आम दारू विक्री करतानाचे विडिओ आहे.अशी माहिती आहे.मुकुटबन पोलीस प्रशासनाचे घनिष्ठ संबंधामुळे कुणी पुहना तक्रार देण्यासाठी समोर येत नाही. मुकुटबन पोलीस स्टेशन मधील पोलीस स्टेशन मधील CCTV फुटेज काढलयांतर सत्य समोर येऊ शकते.



# जावेद दुलेखाँन आत्तार

## बेस्ट ॲक्टीविस्ट ऑफ द मंथ, ऑगष्ट २०२१



जावेद दुलेखाँन आत्तार हे मु.पो.पिंपोडे ता.कोरेगांव जि.सातारा येथील रहिवाशी आहेत.माहिती अधिकार कायदा उत्तम रितीने कसा वापरावा ? यांचं उत्तर जावेद आत्तार हे त्यांच्या कामामधून देत असतात.स्वत:चा रोजगार व व्यवसाय सांभाळून समाजातील घडामोडीवर व आसपासच्या परिसरावर त्यांच बारीक लक्ष असतं.

शिकारी माणसाला वाघ दिसला की त्याचा हात अपोआप खांदयावरील बंदूकीकडे जातो. तसच समाजात समस्या दिसली की जावेद आत्तार यांची बुद्धी माहिती अधिकार या विषयावर विचार करायला लागते.

आपल्या सभोवताली सामान्य माणसांचे खूप अडलेले प्रश्न असतात. सरकारी कार्यालयात सामान्य माणसं चकरा घालून दमून जातात.अशा अडकलेल्या माणसांना मदत करून माहिती अधिकार वापरून त्यांच्या समस्या सोडवून देण्यात सहकार्य करणं यासाठी जावेद आत्तार नेहमी प्रयत्नशील असतात.

सरकारी अधिकारी यांच्या कागदपत्रातील,कामकाजातील त्रूटी व चूका यांवर नेमके बोट ठेवून त्यांना नियमाने काम करण्यास भाग पाडा.या कामात जावेद आत्तार हे माहिर आहेत.

सरकारी यंत्रणेला पत्र,तक्रार,मागणी व सूचना करण्यासाठी आपणास ड्राफ्ट लेखन करावे लागते.जावेद यांच्याकडे उत्तम लेखनकला आहे. अन्य कार्यकर्त्यांनी त्यांच्याकडून हा आदर्श घेतला पाहिजे.

जावेद आत्तार यांची विचार सरणी ही मुक्त व उदारमतवादी आहे. रमजान मध्ये लॉकडाऊन उठवू नका. त्यामुळे कोविड वाढेल. आपण सुखरूप व जिवंत राहिलो तर पुढे कितीतरी रमजान येतील ते आपण त्यावेळी आनंदाने व पवित्र मनाने साजरे करू अशी जी त्यांनी भूमिका घेतली ती खरंच कौतूकास्पद अशी होती.

माहिती अधिकारांचा वापर करणं हे हिंमतबाजांचे काम आहे.यात काही लोकांचे हितसंबंध दुखावू शकतात.असे लोक मग कार्यकर्त्यांना त्रास देतात.असाच अनुभव जावेद आत्तार यांनाही आलेला आहे.त्यांच्या शेतातील पाईप लाईन चे अशा समाजकंटकांनी नूकसान केलं.पण जावेद आत्तार अशा लोकांपुढे नमले नाहीत. व भविष्यातही कधी नमणार नाहीत.

जावेद आत्तार माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अतिशय उत्तम पद्धतीने सोशल मिडीयाचा वापर करतात.अन्य कार्यकर्त्यांनी त्यांचा हा आदर्श घेतला पाहिजे.माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ वाढला पाहिजे म्हणून ते सतत प्रयत्न करीत असतात.त्यच्याकडे त्यासाठी अनेक कल्पना तयार असतात.

जावेद आत्तार यांना माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा बेस्ट मंथ ऑफ ऑगष्ट २०२१ हा पुरस्कार जाहिर होत आहे. एक उत्तम कार्यकर्ता, उत्तम संघटक, उत्तम माणूस चांगला मित्र आणि जबाबदार व दक्ष नागरिक म्हणून जावेद आत्तार यांनी त्यांची ओळख निर्माण केलेली आहे.

शेवटी जावेद ला मी एकच म्हणेन.

रुक जाना नही,तू कही हार के,<br>
काँटों से गुजरकर साये मिलेंगे बहार के

सामाजिक कार्यकर्ता क्षेत्रात जावेद आत्तार यांचा उत्तूंग उत्कर्ष व्हावा. अशा लाख-लाख शुभेच्छा !


## रेडीमेड अर्ज नमूने आजच खरेदी करण्यासाठी खालील लिंक गुगल सर्च करा.

## www.instamojo.com/subhashbaswekar


















# www.rtimahasangh.weebly.com

## www.facebook.com/rtimahasangh/

## Whats App - 9223516920

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, फ्लॅट-३०५ वसूधा सोसायटी प्लॉट नं.५३ सेक्टर-४-बी आसूडगांव खांदा कॉलनी ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे प्रकाशीत केले. RNI रजि नं. MAHMAR/2011/40781